MHKO100011002022 **फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १६१/२०२२**

भरमाजी घटग्याप्पा मगदुम.
//विरुध्द//
ग्रामपंचायत खणदाळ.

## निशाणी क्र.१ वरील आदेश

अर्जदार यांची आई नामे गिरीजाबाई घटग्याप्पा मगदुम यांचा मृत्यू दिनांक ०४/०२/२०१० रोजी मौजे खणदाळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे झालेला असल्याची नोंद करण्याचे आदेश देणेसाठी महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) नुसार सदरचा अर्ज दाखल करणेत आला आहे.

०२. सदरचे अर्जात असे म्हटले आहे की, अर्जदार यांची आई नामे गिरीजाबाई घटग्याप्पा मगदुम यांचा मृत्यू दिनांक ०४/०२/२०१० रोजी मौजे खणदाळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे झालेला आहे. अर्जदार यांनी त्यांचे आईचा मृत्यू झालेनंतर त्यावेळी वि.प. ग्रामपंचायतीकडे कळविले होते. परंतु, वि.प. यांनी तशी मृत्यूची नोंद केलेली नव्हती व नाही. अर्जदार यांना स्थावर मिळकतींना वारसांची नांवे नोंद करण्याकरीता त्यांनी वि.प.यांचेकडे आईचे मृत्युच्या नोंदणी दाखल्याची मागणी केली. परंतु, गिरीजाबाई घटग्याप्पा मगदुम यांच्या मृत्यूची नोंद संबंधीत अभिलेखात नसल्याबाबत दाखला अर्जदार यांना देण्यात आला. त्यामुळे, सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत कामी वि.प. यांना नोटीस मिळून देखील ते हजर झालेले नाहीत व अर्जास म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे, अर्ज त्यांच्या अनुपस्थितीत चालविण्यात आला.

०४. मी अभिलेखाचे अवलोकन केले व अर्जदार यांचे वकीलांचे म्हणणे ऐकले. अर्जदार भरमाजी घटग्याप्पा मगदुम यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.१० व साक्षीदार सुभाष सिध्दाप्पा चौगुले यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.११ वर दाखल करण्यात आलेले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदार यांच्या मुळ अर्जातील कथनांप्रमाणे कथने केलेली आहेत. अर्जदाराने त्यांच्या मागण्यांना आधार देण्यासाठी पुराव्यादाखल दक्षिण महाराष्ट्र केसरी मधील जाहीर नोटीस (निशाणी क्र.९), ग्रामपंचायत खणदाळ यांचेकडील अनुउपलब्धता प्रमाणपत्र, अर्जदार यांचे आधारकार्डची साक्षांकीत प्रत इ. कागदपत्रे दाखल केलेली आहे. अर्जदारने पुरावा संपल्याची पुरसीस निशाणी क्र.१२ अन्वये दाखल केली

आहे. अर्जदाराने वर्तमानपत्रात जाहिरनामा प्रसिध्द करुन देखील ३० दिवसांच्या आत अथवा आजपावेतो कोणीही आक्षेप घेतलेला नाही.

०५. अर्जदाराचे पुराव्यावरुन असे स्पष्ट होते की, गिरीजाबाई घटग्याप्पा मगदुम यांचा मृत्यू दिनांक ०४/०२/२०१० रोजी झाला होता. ग्रामपंचायत खणदाळ येथील जन्म-मृत्यू नोंदणी अभिलेखात गिरीजाबाई घटग्याप्पा मगदुम यांच्या मृत्यूची नोंद झालेली नाही. अर्जदार यांच्या तोंडी पुराव्यावरुन अर्जदार यांचे आईचे मृत्युची नोंद वि.प. यांचेकडे केली नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे, अर्जदार यांच्या आईचे मृत्यूची नोंद करणेस झालेल्या विलंबाकरीता त्यांना त्याबाबतची माहिती नसल्याचे कारण मला समाधानकारक वाटते. त्यामुळे, अर्जदाराने दिलेल्या कागदोपत्री व तोंडी पुराव्यावरुन अर्जदार यांची आई नामे गिरीजाबाई घटग्याप्पा मगदुम यांचा मृत्यू दिनांक ०४/०२/२०१० रोजी झालेला असल्याबाबतचे निष्कर्ष काढणेस मला कोणतीही अडचण दिसत नाही, म्हणून अर्जदार यांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

जन्म-मृत्यू नोंदणी निबंधक, ग्रामपंचायत खणदाळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांनी **गिरीजाबाई घटग्याप्पा मगदुम** यांचा मृत्यू **दिनांक ०४/०२/२०१०** रोजी झाला असलेबाबत संबंधीत जन्म-मृत्यू नोंद अभिलेखात नियमानुसार योग्य ती शुल्क आकारणी करुन नोंद करावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2023.01.03 17:30:26 +0530

दिनांकः ०३/०१/२०२३.
गडहिंग्लज.

**( एस.ए.राठोड )**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, गडहिंग्लज.

I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S.A.Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 03/01/2023 |
| Judgment signed by P.O. on | 03/01/2023 |
| Judgment uploaded on | 03/01/2023 |